भारतीय रिझर्व बँकेनं वित्त आणि पत धोरणाचा द्वैमासिक आढावा आज प्रसिद्ध केला. या आढाव्यात व्याजदरातही बदल झालेला नाही. गेल्या ३ आढाव्यांमधेही व्याजदर बदलले नव्हते. २०२३-२४ या वर्षासाठी रिझर्व बँकेनं स्थूल राष्ट्रीय उत्पादन वाढीचा दर साडेसहा टक्के राहील, असा अंदाज वर्तवला आहे.

<><><><><>

नक्षलविरोधी कारवायांसंदर्भात आढावा घेण्यासाठी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या अध्यक्षतेखाली नवी दिल्लीत महत्वपूर्ण बैठक सुरू आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस या बैठकीला उपस्थित आहेत.

<><><><><>

राष्ट्रवादी काँग्रेसमधल्या फुटीसंदर्भात आज केंद्रीय निवडणूक आयोगासमोर सुनावणी होणार आहे. अजित पवार गटाने निवडणूक आयोगाकडे पक्षाचे निवडणूक चिन्ह मिळावं आणि अधिकृत राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष म्हणून मान्यता मिळावी, यासाठी अर्ज केला आहे. या दाव्याला शरद पवारांसोबत असलेल्या गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी विरोध केला आहे.

<><><><><>

नांदेडच्या शासकीय रुग्णालयात रुग्णांच्या मृत्यू प्रकरणी माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी राज्य सरकारवर टीका केली आहे. ते आज मुंबईत वार्ताहरांशी बोलत होते. कोरोना काळात महाविकास आघाडीच्या याच आरोग्य यंत्रणेनं सक्षम काम केलं होतं. औषधांचा पुरवठा होत नाही, हा रुग्णालयांचे अधिष्ठाता किंवा डॉक्टरांचा दोष नाही, यासंदर्भात केंद्रीय सीबीआय चौकशी करण्याची मागणी ठाकरे यांनी यावेळी केली.

<><><><><>

प्रधानमंत्री मत्स्य संपदा योजनेअंतर्गत मच्छिमारांच्या बोटींमध्ये नवे तंत्रज्ञान बसवलं जाणार आहे. या तंत्रज्ञानामुळे खोल समुद्रात मासेमारी करणाऱ्या बोटी कायम सरकारी यंत्रणेशी संपर्कात राहू शकणार असल्याची माहिती मत्स्य आणि बंदर विभागाचे केंद्रीय मंत्री परूषोत्तम रूपाला यांनी आज नवी मुंबईत दिली. वाशी इथं आयोजित राष्ट्रीय मत्स्य संमेलनात आज ते बोलत होते. या संमेलनासाठी महाराष्ट्र, गोवा, गुजरात राज्यातील सहकारी संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

<><><><><>

निवासी आश्रमशाळांना जाहीर केलेलं २० टक्के अनुदान, तात्काळ द्यावं, अशी मागणी करत बीड जिल्ह्यातल्या शिक्षक, संस्थाचालकांनी सोलापूर - धुळे राष्ट्रीय महामार्गावरील आळणी चौक धाराशिव इथं आज रास्ता रोको केलं. राज्य सरकारनं राज्यातल्या १६५ निवासी आश्रम शाळांना २० टक्के अनुदान मंजूर केलं पण ते अजून दिलेलं नाही, ते त्वरीत द्यावं, अशी मागणी आंदोलनकर्ते करत होते. या आंदोलनात बीड जिल्ह्यातले शिक्षक, संस्थाचालक मोठ्या संख्येनं सहभागी झाले होते.

<><><><><>

मुंबईत गोरेगाव इथं उन्नत नगर परिसरात एका इमारतीला आग लागून झालेल्या दुर्घटनेत 7 जणांचा मृत्यू झाला तर ५१ जण जखमी झाले. त्यातल्या पाच जणांची प्रकृती चिंताजनक आहे. आज पहाटे साडेतीनच्या सुमाराला ही घटना झाली अग्निशमन दलानं आग आटोक्यात आणली असून जखमींना नजीकच्या रुग्णालयात दाखल केलं आहे.

इमारतीच्या बेसमेंट मधे लागलेल्या या आगीत सामान सुमान, दुचाकी गाड्या आणि इतर उपकरणांचं नुकसान झालं आहे. पहिल्या मजल्यावर अडकलेल्या ३० रहिवाशांना सुखरुप बाहेर काढण्यात आलं आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या दुर्घटनेबद्दल तीव्र दुःख व्यक्त केलं असून दुर्घटनेची चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत. तसंच मुंबईचे पालकमंत्री दीपक केसरकर तसेच मुंबई उपनगरांचे पालकमंत्री मंगलप्रभात लोढा यांनी प्रत्यक्ष घटनास्थळी भेट द्यावी, असं सांगितलं आहे. मृतांच्या कुटुंबांना प्रत्येकी पाच लाख रुपये मदत त्यांनी जाहीर केली असून जखमींच्या उपचारांचा खर्चही राज्य सरकार करणार आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी ही दुर्घटनेबद्दल तीव्र शोक प्रकट केला आहे. केंद्रसरकार मृतांच्या कुटुंबांना दोन लाख रुपये तर जखमींना प्रत्येकी ५० हजार रुपये अर्थसहाय्य करणार आहे.

<><><><><><>

चीन मधल्या हांगझाऊ इथं सुरू असलेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेत आज तिरंदाजीत भारतीय महिला खेळाडूंनी व्हिएतनामला 6-2 नं नमवत कांस्य पदक पटकावलं. बॅडमिंटनमध्ये एच एस प्रणॉयनं चीनच्या ली शी फेंगला 2-0 नं हरवत कांस्य पदक पटकावलं. या स्पर्धांमधे भारतानं ऐतिहासिक कामगिरी करत 88 पदकं पटकावली आहेत. यात 21 सुवर्ण, 32 रौ◌्प्य आणि 35 कांस्य पदकांचा समावेश आहे.

<><><><><><>

शासकीय वैद्यकीय महाविद्यालयामुळे रत्नागिरी जिल्ह्यातल्या नागरिकांना उत्तम आरोग्य सुविधा उपलब्ध होतील, अशी अपेक्षा रत्नागिरीचे पालकमंत्री उदय सामंत यांनी व्यक्त केली.

//<><><><><><>//